# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १८७ वा ❑ गुरूवार दि.११ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## नेपाळमधील राजकीय अस्थिरतेचा भारतावर संभाव्य परिणाम

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणात सरकारविरोधी निदर्शने झाल्यानंतर भारताला या पार्श्वभूमीवर बारकाईने लक्ष ठेवण्याची गरजआहे. नेपाळमधील या उलथापालथीकडे भारत खूप गांभीर्याने पाहत आहे. दोन्ही देशांदरम्यान खुली सीमाच नाही तर लाखो नेपाळी लोक भारतात काम करतात. अशा परिस्थितीत, तेथील अस्थिरतेचा भारताच्या सुरक्षा, आर्थिक हितसंबंध आणि राजनैतिक संतुलनावर परिणाम होऊ शकतो.भारताच्या शेजारी देशांमध्ये निर्माण होत असलेली अराजकता चिंताजनक असून भारताच्याही दृष्टीने ही चांगले लक्षण नाही. अलिकडच्या वर्षांत श्रीलंका आणि बांगलादेशमध्ये मोठ्या प्रमाणात तरुणांची निदर्शने झालीत .ज्यामुळे राजकीय उलथापालथ झाली आणि सरकारे पडली.भारत चीन संबंधात सुधारणा होत असताना नेपाळ मध्ये राजकीय अराजकता निर्माण झाली.श्रीलंका आणि बांगलादेशमधील घटनांनंतर.नेपाळमध्ये हिंसा व अराजकता घडली आहे. शेजारील देशांमध्ये अस्थिरतेच्या अनेक घटना घडल्या आहेत, ज्यामुळे राजवटी कोसळल्या आहेत आणि नेते पळून गेले आहेत. हे स्पष्टपणे चांगले लक्षण नाही.

नेपाळ सध्या गंभीर राजकीय संकटाचा सामना करत आहे. काठमांडूमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने होत असताना पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी मंगळवारी राजीनामा दिला. निदर्शकांनी बालाकोटमधील ओली यांच्या वैयक्तिक निवासस्थानाला आग लावली आणि विविध माजी मंत्र्यांच्या निवासस्थानांवर हल्ला केला. सोशल मीडियावरील सरकारने घातलेल्या बंदीविरोधात सोमवारी नेपाळमधील तरुणांनी हिंसक निदर्शने केली. या दरम्यान, पोलिसांनी केलेल्या बळाच्या वापरामुळे किमान १९ जणांचा मृत्यू झाला आणि ३०० हून अधिक जण जखमी झाले.

श्रीलंकेमध्ये २०२२ च्या निदर्शनांनंतर स्थिरता आहे आणि बांगलादेश निवडणुकांकडे वाटचाल करत आहे. म्यानमार अजूनही अस्थिर आहे, पण निवडणुकांकडेही वाटचाल करत आहे. पण अफगाणिस्तानात तालिबान बसले आहे आणि पाकिस्तानमध्येही अनिश्चितता आहे. त्यामुळे, एकूणच, शेजारी देशांचा विचार करता परिस्थिती भारतासाठी आव्हानात्मक आहे. यावेळी आपल्याला अधिक सावध आणि कुशल राजनयिकता स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

भारताचे शेजारी अशांत होणे भारताच्या दृष्टीने चांगले नाही. अशा अस्थिर परिस्थितीत चीन या देशांमध्ये पाय रोवू शकतो.भारत नेपाळ संबंध फार जुने आहेत.नेपाळमध्ये चीनचा प्रवेश होताच नेपाळ भारत संबंधात कटुता निर्माण व्हायला सुरुवात झाली.नेपाळने भारतीय प्रदेशांवर आपला हक्क सांगितला. एवढेच नव्हे तर नेपाळ मधील नकाशात दाखविला. लडाखमध्ये चीनच्या कुरापती सुरू असतानाच नेपाळनेही नखे काढली असून सीमेवरील भारतीय भूभागावर हक्क सांगितला आहे. सीमेवरील लिम्पियाधुरा, लिपुलेक, कालापानी या भारतीय भूभागांचा समावेश करणारा नवा नकाशाही नेपाळने प्रसिद्ध करून भारताला दिव्यांचा प्रकार केला. तर नेपाळच्या या आगळिकीला चीनची फूस असून त्यांच्याआडून वार करण्याचा प्रयत्न होत असल्याची मते तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. भारत नेपाळ मधील सीमावर्ती भागात सुरक्षा धोके वाढू शकतात. व्यापार आणि वाहतूक सेवांवर परिणाम होऊ शकतो.निर्वासितांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.नेपाळच्या लोकांच्या भारताबद्दलच्या भावनांवर परिणाम होऊ शकतो. प्रादेशिक अस्थिरतेचा फायदा घेऊन चीन आपला प्रभाव वाढवू शकतो. तथापि, नेपाळमधील सध्याची परिस्थिती कोणत्याही एका सरकारचे अपयश नाही, तर खोल सामाजिक आणि राजकीय असंतुलनाचे संकेत आहे. भारताने यावेळी संयम, शहाणपण आणि सक्रिय राजनैतिक कूटनीतिने काम करण्याची आवश्यकता आहे. या भूकंपाचा परिणाम सीमांच्या पलीकडे खूप जाणवेल, म्हणून प्रत्येक पाऊल अतिशय सावधगिरीने उचलावे लागेल.

# ज्येष्ठ डॉक्टरांचे कार्य म्हणजे दीपस्तंभ-डॉ.अनुपम टाकळकर

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : आयएमए छत्रपती संभाजीनगर शाखेत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी ७० वर्षांवरील ज्येष्ठ सदस्यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. समाजहितासाठी व वैद्यकीय क्षेत्रासाठी कार्यरत असलेल्या या वरिष्ठ डॉक्टरांचे आयुष्यभराचे कार्य पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

सत्कारमूर्तींमध्ये डॉ. आनंद मलिक, डॉ. अशोक बगडिया, डॉ. दत्ता कदम, डॉ. के. एस. भोपले, डॉ. मधुसूदन भारतीया, डॉ. मृत्युंजय बिलगी, डॉ. निर्मला कदम, डॉ. साधना कुलकर्णी, डॉ. सत्यनारायण सोमाणी, डॉ. सुभाष श्रॉफ, डॉ. सुधीर भोपे, डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. सुनैना मलिक, डॉ. सुरेंद्र गोटूरकर, डॉ. विजय बोरगावकर, डॉ. विनय बऱ्हाळे, डॉ. रवींद्र झंवर आणि डॉ. उज्वला झंवर यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिवाजी सुक्रे, अधिष्ठाता, सरकारी वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर व डॉ. विनायकुमार राठोड, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. अनुपम टाकळकर, अध्यक्ष, आयएमए छत्रपती संभाजीनगर यांनी भूषवले.

यावेळी डॉ. अनुपम टाकळकर म्हणाले, आयएमएचे आजवरचे समाजहिताचे कार्य आपल्या ज्येष्ठ सदस्यांच्या प्रेरणेतूनच घडले आहे. ७० वर्षांनंतरही समाजसेवा व वैद्यकसेवा करीत राहणारे हे आपले मार्गदर्शक आहेत. आजचा हा सत्कार म्हणजे आमच्या कृतज्ञतेची नम्र अभिव्यक्ती आहे. हा गौरव फक्त भूतकाळाचा सन्मान नाही तर पुढच्या पिढीला दिशा दाखवणारा दीपस्तंभ आहे.''

प्रमुख पाहुणे डॉ. शिवाजी सुक्रे म्हणाले, ''शिक्षक हे आपल्या आयुष्याचे मार्गदर्शक आहेत. ते केवळ ज्ञान देत नाहीत तर जीवनातील प्रत्येक टप्प्यावर प्रकाश टाकतात. वैद्यकीय व्यावसायिक केवळ डॉक्टर नसतात, ते समाजाचे नेते आणि मार्गदर्शकही असतात. आजच्या काळात काम आणि ताण यांचा समतोल साधण्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे ठरते.''

प्रमुख पाहुणे डॉ. विनायकुमार राठोड यांनी यावेळी सांगितले की ''डॉक्टर आणि पोलीस हे समाजातील दोन महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. नागरिकांच्या जीवनाशी आमचा थेट संबंध आहे. ज्येष्ठ डॉक्टरांची निष्ठा, शिस्त आणि सेवा ही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. शिक्षक हे ब्रेकसारखे असतात. ब्रेक वाहन थांबवण्यासाठी नसतात, तर गाडीला ब्रेक असतात म्हणून आपण वेगाने गाडी चालवू शकतो. कमी संसाधनं असूनही शिक्षक उत्कृष्ट होते, म्हणूनच आम्ही जीवनात यशस्वी होऊ शकलो.''

सत्कारमूर्तींच्या वतीने डॉ. सुधीर कुलकर्णी म्हणाले, आयएमएने दिलेला हा सन्मान महत्वाचा आहे. वैद्यकीय सेवा ही फक्त व्यवसाय नसून समाजसेवेचे माध्यम आहे. तरुण डॉक्टरांनी समाजहिताची जाणीव ठेवून काम करावे आणि ही परंपरा पुढे न्यावी.''




सेवा हेच आमचे ध्येय राहिले. आजचा हा सन्मान आमच्या प्रवासाचा गौरव आहे. आम्ही दिलेली शिकवण आणि अनुभव तरुण पिढीने अधिक जोमाने पुढे न्यावा. डॉक्टरकी ही सतत शिकण्याची प्रक्रिया आहे. प्रत्येक क्षण हा नवा धडा शिकवतो असे यावेळी डॉ. आनंद मलिक यांनी सांगितले.

सूत्रसंचालन डॉ. शिवाजी पोले व डॉ. सोनाली सावजी यांनी केले. समन्वयक डॉ. आसावरी टाकळकर होत्या तर आभार प्रदर्शन डॉ. सभाजी चिंतले यांनी केले. सचिव डॉ. योगेश लक्कस यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले.

या कार्यक्रमात भूतपूर्व अध्यक्ष डॉ. उज्वला दहीफळे व डॉ. यशवंत गाडे यांचीही उपस्थिती होती.

संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ज्येष्ठांचा सन्मान आणि त्यांच्या जीवनप्रवासातून मिळालेली शिकवण तरुण डॉक्टरांसाठी मार्गदर्शक ठरली. शिक्षक दिनाचे औचित्य साधून आयएमएने ही परंपरा अधिक समृद्ध केली.

# आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी कादंबरीची दखल

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे यांची कादंबरी ''द लास्ट फोल्कटेल'' (इंग्रजी अनुवाद डॉ. विलास साळुंखे, प्रकाशन – ऑथर्स प्रेस, नवी दिल्ली, २०२५) ही केवळ महाराष्ट्रात नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही चर्चेत आली आहे. या कादंबरीची प्रस्तावना अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांची आहे.

यूकेतील ऑस्टिन मॅकॉले पब्लिकेशनच्या संपादकीय मंडळाने या कादंबरीचे कौतुक करत ती ''थ्रिलिंग, गुंतवून ठेवणारी आणि वैश्विक वाचकांना आकर्षित करणारी'' असल्याचे नमूद केले. ''पात्रांची उभारणी, कथानकातील पुराणकथांचा वापर व गहन मानवी भावविश्व'' या कादंबरीची ताकद असल्याचे या पत्रात स्पष्ट केले आहे.

जागतिक बुकर प्राइस विजेत्या रेत समाधी कादंबरीच्या लेखिका गीतांजली श्री आणि जागतिक बुकर प्राईस विजेत्या बानू मुश्ताक यांनी या कादंबरी बद्दल फोन द्वारे विशेष अभिनंदन केले आहे.नेदरलँड्समधील कला समीक्षक भास्कर हांडे यांनी या कादंबरीला ''मराठी संस्कृतीच्या बोली–गायन–नाट्यपरंपरेशी संवाद साधणारी क्लासिक कादंबरी'' असे संबोधले.

न्यूयॉर्कमधील कवयित्री नयना निगळे यांच्या मते, ''द लास्ट फोल्कटेल ही उत्तर–आधुनिक तंत्र व स्थानिक लोकपरंपरेचे अद्वितीय मिश्रण आहे. ती सहज वाचकांसाठी आव्हानात्मक ठरू शकते, परंतु मराठी कादंबरीच्या व्याख्येला नवी दिशा देते.''

केरळमधील समीक्षक सिजो जोसेफ चेनलील यांनी या कादंबरीतील ''जादुई वास्तववाद, अस्तित्ववादी प्रश्न व विस्कळीत मानवी नात्यांचे चित्रण'' अधोरेखित करत तिला ''२१व्या शतकातील साहित्यिक चमत्कार'' असे गौरवले.

डॉ. बाळासाहेब लबडे यांनी यापूर्वी कविता, कादंबरी व समीक्षेच्या क्षेत्रात १८ पुस्तके प्रकाशित केली असून त्यांना पद्मश्री विखे पाटील पुरस्कार, वांग्मय चर्चा मंडळ बेळगाव, वसंत राशिनकर पुरस्कार इंदोर, कुसुमाग्रज राज्य काव्य पुरस्कार, नारायण सुर्वे काव्य पुरस्कार, पद्मश्री नामदेव धसाळ काव्य प्रतिभा पुरस्कार यांसह अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. ''द लास्ट फोल्कटेल'' या कादंबरीमुळे मराठी साहित्यातील लोककथांना जागतिक संदर्भ मिळाला असून, मराठी साहित्य जागतिक वाचकांच्या चर्चेत आणणारे हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

# साताऱ्यात होणाऱ्या ९९ व्या साहित्य संमेलनासाठी मराठी भाषा विभागाकडून अतिरिक्त एक कोटी रुपये-मराठी भाषा मंत्री

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – मराठी भाषेची संस्कृती व परंपरा जतन करण्याची जबाबदारी साहित्यिक व मराठी भाषिकांबरोबरच शासनाचीही आहे. सरकारने हिंदी भाषेची सक्ती केलेली नाही, असे स्पष्ट करताना शासन मराठी भाषेच्या समृद्धीसाठी सदैव प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज व्यक्त केली. ते अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आयोजित कार्यक्रमात बोलत होते.




सातारा येथे होणाऱ्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी मराठी भाषा विभागामार्फत अतिरिक्त एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याची घोषणा सामंत यांनी केली. महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा व मावळा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण ज्येष्ठ हास्यचित्रकार शि. द. फडणीस यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात हा कार्यक्रम झाला.

याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कार्यवाह सुनिताराजे पवार, कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, कोषाध्यक्ष नंदकुमार सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.


मराठी भाषेची परंपरा शालेय शिक्षणात समाविष्ट व्हावी तसेच उत्तमोत्तम साहित्याचे मराठीत अनुवाद व्हावेत यासाठी अनुवाद समिती स्थापन करण्यात आली असल्याचे सामंत यांनी सांगितले. राज्यातील अमराठी व्यक्तींना मराठी शिकण्यासाठी लवकरच ॲप विकसित केले जाणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

ज्ञानेश्वरी व गाथेतील विचार सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचावा यासाठी मराठी भाषा विभागामार्फत प्रत्येकी एक कोटी रुपये उपलब्ध करून दिले असल्याचे सामंत यांनी नमूद केले. मराठी भाषा सातासमुद्रापार पोहोचावी यासाठी लंडनमध्ये वैश्विक मराठी भाषा केंद्र सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच विश्व साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन, बालसाहित्य संमेलन व युवा साहित्य संमेलन आयोजित करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी ३३ वर्षांनंतर साताऱ्यास संमेलनाचे यजमानपद मिळाल्याचा आनंद व्यक्त करून साताऱ्याच्या परंपरेला शोभेल असे संमेलन करण्याचे आश्वासन दिले.

ज्येष्ठ हास्यचित्रकार शि. द. फडणीस यांनी साकारलेल्या बोधचिन्हामधील लेखणी व तलवारीचे प्रतीक साहित्यनिर्मितीबरोबरच सामाजिक दंभ व ढोंगावर प्रहार करणारे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले व आभार प्रदर्शन कार्यवाह सुनिताराजे पवार यांनी मानले. मान्यवरांचा सत्कार सातारच्या पेढ्यांच्या हाराने करण्यात आला.






# जात्यावरच्या ओव्या......

लेकीचं लगन
निरोप वैराळाला
लेकी, भाच्या, सुना,
भर बांगड्या गोताला ||२५३||

लेकीचं लगन
बाकू बुक पोटामंदी
पोटाचा गोळा
लोकांच्या वटीमंदी ||२५४||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# उदरभरण नोहे...




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

आपल्याकडे जेवताना म्हणायचा एक श्लोक आहे.
''वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे ।
सहज हवन होते नाम घेता फुकाचे ।।
जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म ।
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ।।

जेवण करणे म्हणजे केवळ पोट भरणे नव्हे. त्याला यज्ञकर्माची सुंदर उपमा दिली आहे. ते पूर्णब्रह्म आहे. वदनी कवळ म्हणजे घास घेताना श्रीहरीचे नाव घेऊन जेवायला सुरुवात करावी वगैरे वगैरे. आता तर काळाच्या ओघात आम्ही हा श्लोकच विसरलो आहोत बुवा ! अहो, कसले यज्ञकर्म अन कसले काय घेऊन बसलात ! आम्ही पडलो पोटार्थी ! आम्हाला हे यज्ञकर्म वगैरे असलं काही अजिबात मानवत नाही. ताकाला जायचं अन भांडं कशाला लपवायचं ? त्यामुळे आम्ही सरळ जेवायलाच जातो. उदरभरणासाठी. यज्ञकर्म वगैरे ज्याला वाटेल त्याने ते खुशाल करत बसावं. आम्हाला हॉटेलातलं जेवण अतिप्रिय ! म्हणजे काय तर तसं घरी जमतच नाही बघा. घरी कांदाभजी केली, मिसळ केली किंवा आणखी ढोकळे की काय म्हणतात ते केले तरी त्याला हॉटेलसारखी चव थोडीच येणार ? घरी भाजी कोणतीही बनवा. ती होणार अगदी सपक, मिळमिळीत. त्यामुळे आठवड्यातून एक दोन वेळा तरी आम्ही हॉटेलमध्ये जाऊन मस्त चमचमीत मिसळ,वडा वगैरे चापतो. जेवायला गेलो तर दोन तीन चमचमीत भाज्या मागवतो. त्याशिवाय मनच भरत नाही बघा. म्हणजे आमच्यासाठी घर की मुर्गी दाल बराबर. हां, सुरुवातीलाच सांगितलेले बरे की आम्ही आहोत पक्के शाकाहारी. त्यामुळे वरील म्हणीचा शब्दशः अर्थ अजिबात घेऊ नका.



तर हॉटेलात जायचे फायदे किती ते सांगतो. गाडी पार्किंगचा प्रश्न येत नाही. सिक्युरिटीचा माणूस आमच्याकडून गाडीची चावी घेऊन स्वतः गाडी पार्किंगला घेऊन जाणार. हॉटेलात गेलो की काउंटरवरचा मॅनेजर आमचं हसून स्वागत करणार. ''या साहेब'' तोंडभरून म्हणणार. वेटरही आता ओळखीचा झालाय. आम्हाला पाहिल्याबरोबर एअर इंडियाच्या महाराजासारखं झुकून अदबीनं स्वागत करणार. घरी असलं वातावरण कुठं मिळणार ! टेबलावर जेवणाचं ठेवलंय. वाढून घ्या. हवं तर गरम करून घ्या. फ्रिजमधून अमुक अमुक लागलं तर घ्या ! तुमचं जेवण झालं की सगळं झाकून ठेवा. किती सूचना ऐकाव्या लागतात. हॉटेलमध्ये ही भानगडच नाही. तिथे आपल्या सूचना ! आणि ऐकणारे वेटर.

गेल्याबरोबर बिसलरीची बाटली आणून ठेवणार. सांगावं नाही लागत. लगेच मेनूकार्ड येतं. **(क्रमशः)**






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# शुध्दज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

भाषा आहे. वेदांच्या पेक्षा श्रेष्ठ काहीच नाही. कारण वेदांचे सारें रहस्य वेदांतामध्ये प्रगट झालेले आहे.


अशा वेदांताच्या जो तात्पर्यार्थ आहे आणि जो अत्यंत खोल परमार्थ आहे . अतिशय खोल आणि अर्थगंभीर असे जर काही असेल तर तेसद्गुरूंचे वचन होय. त्यावचनाने निश्चित पणे समाधान मिळते. सद्गुरूचे वचन तोच खरा वेदांन्त तोच खरा सिध्दांत होय. ते खरे अनुभवलेले ज्ञान होय. सद्गुरूच्या चरणांशी सतत ''दास''म्हणून राहिले पाहिजे.

स्वतः जर परमात्म स्वरूप आहे आत्मज्ञानाचे सर्वांगाने वर्णनं केले. सद्गुरूशी अनन्य होऊन ते ज्ञान प्राप्त होते व पूर्ण समाधान मिळते.

''अहं ब्रम्हास्मि'' हे महावाक्यांमध्ये सर्व समाधान मिळते.यात गुरू व शिष्य एकरूपहोऊन जातात. शिष्या,या महावाक्यातील मर्म समजून घे. तू स्वतः ब्रम्ह आहेस.यात संशय धरू नकोस. समर्थानी भक्तिचे न ऊ प्रकार सागितलेत। आत्मनिवेदन. हा त्यातला मुख्य प्रकार आहे। विश्व निर्माण होते त्यावेळी ही पंचमहाभूत क्रमाक्रमाने निर्माण होतात पण विश्व अशाश्ववत आहे,त कल्पांताच्या वेळी ते नाश पावते. तेव्हापासून ही पंचमहाभूते ज्या क्रमाने निर्माण होतात,त्याच क्रमाने लय पावतात.

येवढेच नाही तर अखेर उरणारी दोघे. प्रकृती आणि पुरूष ती देखील परब्रम्हात विलीन होतात. जर सर्व द्रुष्यवस्तु नाश पावल्या म्हणजे मी पणाने वावरणारा मी देखील उरत नाही. कारण मुळांतच परमात्मा एकरूप असल्याने दुसरे काही कर्वे लागत नाही.

# आपल्या मीचे स्वरूप आनंदमय आहे.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

इच्छित वस्तू मिळणे यात समाधान असतेच असे नाही. ती इच्छाच नाहीशी करणे यात समाधान आहे. हाव संपेल तेव्हाच समाधान होईल. याकरिता वासनाक्षय कशाने होईल ते पाहावे. कशात सुख आहे, कशाची कास धरावी, इकडे लक्ष द्यावे. खरा आनंद आणि समाधान भगवंताचे होण्यातच आहे. 'भगवंता, तुझ्यावाचून माझे कोणी नाही' हे ज्या दिवशी मनाने पक्के ठरेल, त्याच दिवशी समाधान मिळेल. जितकी विषयाची आवड धरावी, तितके दुःखच पदरात येते. विषयसुख न मागताही येते; परंतु जे परमार्थाच्या आड येणार आहे, ते मागत कशाला राहायचे ? माझ्या मागे राम आहे म्हटले, म्हणजे प्रपंचातल्या विषयात जरी राहिलो तरी भिण्याचे कारण नाही. भगवंताचा आधार कायम ठेवला की मग विषयांची नाही भीती वाटत. नेहमी अनुसंधानात राहिले म्हणजे मग ' सावधच ' राहिल्यासारखे आहे.

दिवाळी हा आनंदाचा दिवस असतो, पण दिवाळीचा दिवस हा इतर दिवसांसारखाच असतो. इतकेच नव्हे, तर आदल्या दिवसाची परिस्थिती, संकटे आणि अडचणी त्या दिवशीही कायम असतात. याचा अर्थ असा की, परिस्थितीत बदल होत नाही. दिवाळीचा दिवस, हा दिवस या नात्याने निराळा नाही. पण काल आपण जे केले, ते दिवाळीच्या दिवशी आपण करीत नाही, हाच मुख्य फरक होय. आपणच दिवाळीच्या दिवसाला आनंदाचा दिवस करतो. हे जर खरे, तर तसा तो आपण नेहमीच का करू नये ? आपल्याला नेहमीच दिवाळी असावी; आपण नेहमीच आनंदात असावे; आणि त्याकरिता आनंदमय अशा भगवंताचा आधार घ्यावा. आपण दिवाळीच्या सणाचा आधार घेऊन आनंदी-आनंद करतो. मग आनंद जो निर्माण करतो त्या भगवंताच्याच आश्रयाला नेहमी का न जावे ? भगवंताचा आनंद हा फार बलवत्तर आहे. तो एकदा मिळाल्यावर प्रपंचातल्या लाभहानीचे महत्त्व वाटत नाही. भगवंताचे स्वरूपच मुळी आनंदमय आहे. असा आनंदमय भगवंत आपल्या आतमध्ये असून आपण दुःख भोगतो याला कारण, भगवंताला प्रकट व्हायला आपणच आपल्या आतमध्ये आडकाठी करीत असतो. आपल्या आतमध्ये भगवंत तर आहेच, पण त्याचबरोबर 'मी' सुद्धा आहे. हा 'मी' कोण हे जाणण्याकरिता, इंद्रियांची गडबड शांत करून आतमध्ये आपण आनंदाचा शोध करावा; म्हणजे आपल्याला या 'मी' चे स्वरूपही आनंदमय असल्याचे प्रत्ययाला येईल. अशी परमात्म्याची ओळख करून घेणे ही खरी जीवनाची सुरुवात आहे; आणि परमात्म्यात विलीन होणे हेच जीवनाचे सर्वस्व होय. ज्याचा आनंद टिकेल त्याला नित्य दिवाळी आहे.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा अभंग- भाग चार

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या अवतीभोवतीच्या साऱ्याच वस्तू ,इतकेच काय तर आपली पत्नी मुले नातेवाईक अवती भोवतीची सर्व माणसे यांचा मालक पांडुरंग आहे ,ही भावना दृढ व्हायला हवी. एकदा अंतर व बाह्य मनाचा संघर्ष संपला व दोन्ही मने प्रभु भक्तीत लीन झाली की अंतर्मन हे माऊली होते. म्हणून मन माउली सर्वांची असे म्हटले आहे. असे मन तुमच्या हिताचे व अनहिताचे काय हे ठरवते, व योग्य तेच संकेत देते. मन हे स्वतः गुरु व शिष्यही बनते अंतर्मन हे गुरु झाले पाहिजे व बाह्यमन शिष्य. शिष्य हा नेहमी गुरुची आज्ञा पालन करणारा असतो. त्याप्रमाणे बाह्यमन हे अंतर्मनाचे आज्ञा पालन करणारेच व्हावे. बाह्यमन हे विकारी असते गुरुची आज्ञा शिरसावंद्य त्याने मानावयाला हवी. तशी मालकी अंतर्मनाकडे द्यायला हवी. बाह्यमन आज्ञाधारक व्हावे. यानंतर मालकी आत्म्याकडे व शिष्यत्व अंतर्मनाकडे जायला हवे. अंतर्मन व बाह्य मनात विरोधाभास नको. अंतर्मनाचे दास्यत्व बाह्य मनाने केले पाहिजे. सत्कार्य करण्याचे अंतर्मनाने सांगून बाह्य मनाने ते ऐकणे म्हणजे स्वतःचे दास्य स्वतः केल्यासारखे आहे. दुसऱ्याची सेवा करताना देखील त्याच्यात व माझ्यात एकच प्रभू आहे, त्यामुळे त्याची सेवा म्हणजे स्वतःचे दास्य केल्यासारखे असते. आपल्या सेवेमुळे भगवंत प्रसन्न होतो व ते प्रसन्नत्व पाहून आपण प्रसन्न व्हावे. हे प्रसन्नत्व मिळण्यासाठी इतरांची सेवा केली पाहिजे. दोन्ही मनात संघर्ष म्हणजे अधोगती कडे नेतो व त्याच्यातील ताळमेळ व मधुर संबंध गुरु शिष्य भाव हा गती कडे नेतो. तुका म्हणे मना नित्य नवा अंकुश या मनावर सतत आत्म्याचा अंकुश हवा. मन हे स्वतः सतत विकार संघर्ष असंतोष निर्माण करत असेल तर नर्क समोर आहे हे समजा.

ही बाब केवळ सामान्य वाचकां साठीच नव्हे तर भक्त, साधक यांसाठी सुद्धा लागू आहे. मनाच्या मृत्यूसाठी तयार व्हायला हवे. हे बलिदान प्रेमातून ध्येय वादातून मिळू शकते. दोन मनाच्या संघर्षातून नव्हे. माझे मरण पाहिले मी डोळा याचा अर्थ मनाचा मृत्यू म्हणजे समाधी.

माणसे शरीराने जवळ व मनाने दूर झालेली आहेत. कारण मनात संघर्ष आहे. बाह्य मनाला अंतर्मनावर प्रेम करायला लावायला हवे. म्हणून तू मन हे मीच करी असे म्हटले आहे. याशिवाय रूण झुण रुणुझुणु रे भ्रमरा याही अभंगातून हेच सांगितले आहे.

मनात प्रेम भाव वृद्धिंगत व्हावा म्हणून आपल्या संतांनी अनेक विविध प्रयोग दिले आहेत तुलसीदासजी म्हणतात सियाराम स्वरूप सब जग जानी करहू प्रणाम जोड जूग पानी. आपल्या अवतीभवती दिसणारे सर्व जीव ,भूत मात्र यांना सीता माता आणि प्रभू रामचंद्र या रूपात पहा. त्यांना विनम्रतेने अभिवादन करा. असे करत गेले की ,सर्व भूत मात्र हे ईश्वराचे रूप आहेत हा भाव मनात दृढ व्हायला लागतो व सर्व चरा चरावर प्रेम निर्माण व्हायला लागते. असे प्रेम निर्माण झाले की आपल्या मनातही प्रेमाचा डोह वृद्धिंगत होतो.

संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराजांनी हा मनाच्या प्रसन्नता का आवश्यक आहे हे सांगणारा हा एक उत्कृष्ट असा अभंग आपणास दिला आहे .

यानिमित्ताने हाअभंग केवळ वाचन किंवा श्रवण करून कृत कृतार्थ मानणे यापेक्षा मनाला प्रसन्न करण्यासाठी, त्यावरील ताण कमी करण्यासाठी, यात सुचविलेले प्रयोग कसोशीने करायला हवेत.

हे प्रयोग आपण सर्व जन करूयात व जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या चरणावर दंडवत घालूयात.

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई
एकनाथ नामदेव तुकाराम
क्रमशः...
माझ्या समर्थ सद्गुरूंच्या ज्ञानगंगेतील अमृतधारा
जय हरी माऊली!

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**स्तोत्रमिदं परावाचा चन्द्रहासोक्तमिष्टदम्।**
**अर्पितं तेन सर्वं हि गुरुपादरजःकणे।।३३।।**

चंद्रहासाने इष्टद असे हे स्तोत्र परावाणीने वदिले आहे. त्याने सर्व काही गुरुपादरजःकणी अर्पण केले आहे.

**अथ श्रीमत्भगवत्परशुरामवन्दनम्।**
**रेणुकागर्भसम्भूतं जमदग्निसुतं प्रियम्।**
**परशुधारिणं रामं नमामि भृगुनन्दनम्।।३४।।**

रेणुकागर्भसंभूत, जमदग्निपुत्र, आनंदकारक, परशु धारण करणाऱ्या भृगुवंशीय रामास मी नमस्कार करतो.

**राजते विक्रमो यस्य मातृभक्तिस्तथैव च।**
**गोविप्रपालनार्थं हि तेन जिता वसुन्धरा।।३५।।**

ज्याचा पराक्रम तसेच मातृभक्ती शोभून दिसते, त्याने गोविप्र प्रतिपालनार्थ वसुंधरा जिंकली आहे.

**गभीरभूरिसङ्घर्षो येन कृतः सकारणम्।**
**स्थापितो राजदण्डोऽपि धर्मरक्षणहेतवे।।३६।।**

सकारण असा गंभीर व प्रखर असा संघर्ष ज्याने केला, त्याने धर्मरक्षणार्थ राजदंड स्थापित केला.

# ॥ आरोग्य संजीवनी ॥




## बेलफळांचा वापर आयुर्वेदिक औषधांमध्ये भरपूर केला जातो.

ज्योतिर्मय साहित्य

तसेच या झाडाची पाने, फुले, झाडाची साल व खोडाचा गाभा याचाही आयुर्वेदिक औषधी म्हणून उपयोग करता येतो. बेलाचे झाड हे वातावरण शुद्धीकरणाचे कार्य करते.

बेलाची पाने रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी उपयुक्त मानली जातात. यामध्ये रेचक गुणधर्म मोठ्या प्रमाणात आढळतात. जे पुरेसे इन्सुलिन तयार करण्यात मदत करतात. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. आयुर्वेदाचार्यांशी सल्लामसलत केल्यानंतर ते सेवन केले जाऊ शकते.

पोट साफ होते

बद्धकोष्ठतेची समस्या असल्यास वेलाची पाने खावीत. बेलची पाने थोडे मीठ आणि मिरपूड चघळल्याने बद्धकोष्ठतेपासून आराम मिळतो. ही पाने आतड्यांमधून विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात, असेही म्हटंले जाते.

पचनक्रिया चांगली राहते

बेल पोट साफ करण्याचे काम करते. यात रेचक गुणधर्म आहेत जे पाचन तंत्र मजबूत करतात. तुम्हाला पचनाच्या समस्या असतील तर बेल किंवा बेलची पाने खाऊ शकता. परंतु ती प्रमाणात खाणे गरजेतचे आहे.

मधुमेहाच्या रुग्णांसाठी

बेल अतिशय फायदेशीर आहे. दिवसातून दोन वेळा बेलाच्या पानांचा रस पिल्यास मधुमेहापासून मुक्तता मिळविणे शक्य होऊ शकते. शरीराच्या वजनानुसार बेल फळाचा अर्क घेतल्यास त्याचा परिणाम दिसून येतो. कारण कौमारीन नावाचा घटक बेल फळामध्ये असल्यामुळे इन्सुलिन निर्माण करण्यासाठी बीटा पेशीला उत्तेजित करतो.

अतिसार विरोधी

उन्हाळ्याच्या दिवसात अतिसार ही समस्या आता अधिकांश लोकांमध्ये दिसून येते. अलीकडे या रुग्णांचे प्रमाण वाढीस लागले आहेत. या परिस्थितीत उलट्या, हगवण, मळमळ वाटू लागते. बेलाच्या पाण्यात साखर मिसळून प्यायल्यास याचे लाभ दिसून येतात. किंवा कच्चे फळे खाल्यास अतिसार नियंत्रणामध्ये येतो. अर्धे पिकलेली फळ हे सर्वोत्तम मानले जाते परंतु संपूर्ण पिकलेली फळे किंवा अगदी फळाचा चूर्ण परिणामकारक परिणाम दर्शवितो.

रक्तक्षयविरोधी

बदलत्या जीवनशैलीत अनेकांना रक्ताच्या कमरतेचे लक्षण दिसून येतात. अशा परिस्थितीत वाळलेल्या बेलाच्या गराचा चूर्ण तयार करा. तो चुर्ण गरम दुधात रोज एक चमचा टाका आणि प्या. यामळे शरीरात नवीन रक्त तयार होण्यास सुरुवात होते.

ऊन लागल्यास

जागतीक तापमानवाढीमुळे दरवर्षी उन्हाळ्यात तापमानचा पार वाढतो. दरवर्षीचा हा अनुभव असल्याने अनेकांना ऊन लागते. हा त्रास सुरू झाल्यास बेलाच्या ताज्या पानांना कुटून मेहंदीप्रमाणे तळपायावर लावावे. अशा वेळी बेलाचा शरबत प्यायल्यास तत्काळ आराम मिळतो.

बेल फळाच्या लगद्यामध्ये स्टिरॉइड्स, कूमारिन्स, फ्लॅनोनोयड्स, टेरपेनॉईड, फिनोलॉलिक संयुगे, लिग्निन, इनुलीन, आणि अन्य एंटिऑक्सिडेंट जी आपल्याला जुनाट रोगांपासून वाचवू शकतात. याव्यतिरिक्त, त्यात प्रथिने, कर्बोदके, खनिजे (कॅल्शियम, फॉस्फरस, पोटॅशियम, लोह) आणि जीवनसत्वे (विट ए, विट बी, विट सी आणि रिबोफ्लेव्हिन) यांचा समावेश आहे. ॲल्कॉइड, कार्डियाक ग्लायकोसाइड आणि फ्लॅनोनोयड्स इत्यादीचा उत्तम स्त्रोत आहे. बेलफळ हे स्थानिक पारंपारिक औषधांसाठी वापरले जाणाऱ्या महत्वाच्या झाडांपैकी एक आहे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

सीतेने मंदोदरीला विचारले कशा साठी आली. ती अतिशय हुशार आहे तिला परस्पर विरोधी दोन गोष्टी तिला विचारायचे होते तिला मनात असलेले रामाचे स्वरूप संबंधी विचारायचे होते व तिला रावणाचा प्रश्न विचारायचा होता. ती म्हणे तुझा राम आत्मा आहे की एकदेशी आहे (म्हणजे देव नाही माणूस आहे). तिने सीतेला अजून गोंधळात टाकायचे ठरविले. ती म्हणते. तू रामाला एक देशी म्हणत असशील तर तो जीव आहे तो आज मी उद्या मरणाचं आहे आणि तो जर व्यापक आहे तर तो रावणातही आहे. मग तुला त्याच्याशी लग्न न करायला काय अडचण आहे. सीता म्हणाल्या माझा राम एकदेशी नाही आत्माराम आहे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

मग रावणातही तोच आहे यावर ती म्हणे रावणातही तोच आहे तर मी पुनः लग्न त्याचेशी का लागावे? माझा राम मुंगी पासून ब्रम्ह देवापर्यंत तोच राम असेल तर एक सांग मान्यताही राम रावणाची राम मग एक रामाचे दुसऱ्या रामाचे लग्न कसे होईल,

रावणात जर राम आहे तर रावण कोठे आहे हे सिद्ध कर मी त्याच्याशी लग्न करते. मंदोदरीला हा तर्क पटला. तिचे समाधान झाले. तिला रामाच्या स्वरूपाचे जे जाणायचे होते ते जाणले व ती परत गेली. युद्ध सुरू झाले. रोज नवे सैन्य आणावे.ते रामाने मारावे.वाणारही कांहीं मेले. युद्ध नंतर राम लक्ष्मणास म्हणाले तू इंद्राला बोलाव व त्याला सर्व वानर लढताना मेले त्यांना अमृत पळवून उठवायला सांग.

**(क्रमशः)**

# भय इथले संपत नाही



**ज्योतिर्मय साहित्य**

मित्रहो,

भय किंवा भीती हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आपल्यापैकी प्रत्येकालाच आपल्या जीवनात कधी ना कधी भीतीचा सामना करावा लागलेला असतोच.

जरा आठवून पहा. खालीलपैकी पैकी कुठल्या न कुठल्या भीतीने कधीतरी आपल्याला ग्रासलेले होते, हे आपल्या लक्षात येईल. अकारण वाटणाऱ्या भीतीला इंग्रजी भाषेमध्ये फोबिया म्हणतात.

आज आपण भय किंवा भीतीचे वेगवेगळे प्रकार पाहणार आहोत.

१. अपघाताची आत्यंतिक भीती – ज्याने एखादा मोठा अपघात नजीकच्या काळात अनुभवला किंवा पाहिला, त्याला वाटणारे भय. एखाद्या अपघातामध्ये जवळची व्यक्ती गमावली असेल तरी अशी अपघाताची भीती सतत वाटत राहते.

२. विमानात बसण्याची भीती – कधीकधी विमानात बसून उडण्याची कल्पनाच भीतीचे कारण ठरते.

३. जनावरांची भीती – यामध्ये झुरळाच्या भीतीपासून वाघाच्या भीतीपर्यंत सर्व प्रकारच्या भीतीचा समावेश आहे.

४. टक्कल पडण्याची अनाठायी भीती

५. रक्ताची भीती – दवाखान्यात ऑपरेशनच्या वेळी किंवा रस्त्यावर अपघाताच्या वेळी जे रक्त सांडते त्याची भीती वाटणे. असे रक्त पाहणारा लगेच चक्कर येऊन पडू शकतो.

६. छोट्या जागेत जीव घुसमटण्याची भीती – यात बोगदा, लिफ्ट, सार्वजनिक स्वच्छतागृह किंवा रेल्वेच्या अगदी वरच्या बर्थवर होणारी घुसमट असते.

७. रस्ता ओलांडण्याची भीती – विशेषत: वर्दळ किंवा वाहतूक सुरु असतांना रस्ता ओलांडण्याची भीती वाटणे.

८. लोकांची किंवा गर्दीची भीती– गर्दीमध्ये अनेकांना असुरक्षित वाटते.

९. अंधाराची भीती – विशेषत: रात्रीच्या वेळी वाटणारी भीती किंवा अंधाऱ्या खोलीत वाटणारी भीती. निक्टोफोबिया म्हणजे रात्रीची किंवा अंधाराची तीव्र भीती वाटणे, ज्यामुळे चिंता आणि नैराश्याची तीव्र लक्षणे उद्भवू शकतात. जेव्हा भीती जास्त, तर्कहीन असते किंवा तुमच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करते तेव्हा ती फोबिया बनते. अंधाराची भीती बहुतेकदा बालपणात सुरू होते.



**उद्धव भयवाळ**
**१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी,**
**गादिया विहार रोड, शहानूरवाडी**
**छत्रपती संभाजीनगर मो.८८८८९२५४८८**

१०. प्रेताची, अंत्ययात्रेची किंवा स्मशानाची भीती.

११. दातांच्या डॉक्टरची भीती, दात काढण्याची भीती.

१२. खोल जागेची भीती – गुहा, विहीर वगैरे

१३. कुत्र्याची भीती – आजकाल तर कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबरोबर ही भीती खूपच वाढली आहे.

१४. इलेक्ट्रिसिटीची विजेची भीती

१५. आगीची भीती. १६. कीटकांची भीती.

१७. भूतांची भीती.

१८. उंच इमारतींची भीती – उंच जागेवरून पडणे किंवा इतरांना पडतांना पाहणे, यामुळे ही भीती निर्माण होते.

१९. हॉस्पिटलची भीती

२०. आजाराची भीती – कुणाचा एखादा आजार बघितला की, ''मलासुद्धा हा आजार होईल का?'' अशी भीती वाटत राहते.

२१. इंजेक्शनची भीती

२२. आकाशात कडाडणाऱ्या विजेची भीती


२३. एकटेपणाची भीती. २४. यंत्रांची भीती

२५. मोठ्या आवाजाची भीती.

वर दर्शविलेल्या भीतीच्या प्रकारांपैकी कुठल्या ना कुठल्या तरी भीतीला आपण एकदा तरी आपल्या आयुष्यात सामोरे गेलो होतो हे तुमच्या लक्षात येईल.

# भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे

**ज्योतिर्मय साहित्य**



थोर गांधीवादी नेते भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज १३० वि  जयंती. कोकणातील रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील गोगादे या छोट्या गावात ११ सप्टेंबर १८९५ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव विनायक नरहर भावे असे होते. आचार्य ही त्यांना मिळालेली पदवी आहे. त्यांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील वाई हे आहे. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. तिथे त्यांचे आजोबा आणि आईने त्यांच्यावर धर्मपरायणतेचे संस्कार केले. वाई मुक्कामी विनोबा भावे यांनी  स्वामी केवलानंद सरस्वतीच्या चरणांशी उपनिषदे, ब्रह्मसुत्रे, शंकरभाष्ये व पतांजलीचे शिक्षण घेतले. पुढे नोकरीनिमित्त त्यांचे वडील बडोदा येथे गेले. तिथेच त्यांचे माध्यमिक व उच्च शिक्षण झाले. तिथे त्यांनी संस्कृत, फ्रेंच भाषेचा आणि इतर अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईला निघाले. पण वाटेतच सुरतेस उतरुन  आई वडिलांना न कळवता ते वाराणसी येथे निघाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते हिमालय आणि बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे  हिंदू विश्वविद्यालयात त्यांनी महात्मा गांधींचे भाषण ऐकले आणि त्या भाषणाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाला. हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती या दोन्हींच्या प्रेरणा त्यांना महात्मा गांधींच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्वात आढळल्या. ७ जून १९१६ रोजी कोरचब आश्रमात त्यांनी गांधीजींची भेट घेतली. या भेटीतच त्यांनी ब्रह्मचार्यांची शपथ घेतली आणि जीवनसाधनेस सुरवात केली. तिथे ते सूतकताई शिकले. १९२१ रोजी जमनालाल बजाज यांनी साबरमती आश्रमाची शाखा वर्ध्यास काढली तिचे संचालक म्हणून ८ एप्रिल १९२१ रोजी त्यांनी जबाबदारी स्वीकारली. भगवत गीतेचे सार त्यांनी अत्यंत सोप्या आणि रसाळ शैलीत गीताई आणि मधुकर या ग्रंथातुन  मांडले. त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे  भूदान चळवळ. मोठ्या जमीनदारांकडून जमीन घेऊन त्यांनी त्या भूमिहीनांना दिल्या. भूदान आंदोलनासाठी त्यांनी /देशभर यात्रा काढली. गरिबांच्या कल्याणासाठी  त्यांनी सर्वोदय योजना सुरू केली. १९३०–३२ च्या कायदेभंग चळवळीत कारावास भोगलेले विनोबा भावे महात्माजींच्या १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाचे गांधींनी निवडलेले पहिले सत्याग्रही होते.  १९५१ ते १९५३ हा भूदान यात्रेचा कालावधी वगळता सारे आयुष्य त्यांनी वर्ध्याच्या पवनार आश्रमात काढले. भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला.  समाजाला मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या या सत्पुरुषाचे १५ नोव्हेंबर १९८२ रोजी निधन झाले. आचार्य विनोबा भावे यांना  जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# आदित्य चौधरी व समीर जाधव यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड




**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती व सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने केडगाव येथे संपन्न झालेल्या आंतर महाविद्यालयीन आर्चरी मुले स्पर्धेमध्ये इंडियन राऊंड ह्या क्रिडाप्रकारात वाघिरे महाविद्यालय, सासवड येथील प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या आदित्य चौधरी व समीर जाधव या दोन खेळाडूंची सर परशुराम महाविद्यालय, पुणे येथे होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दोन्ही खेळाडू प्रशिक्षक सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहेत. सदर यशाबद्दल खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित शेळके, उपप्राचार्य डॉ.बी.यु.माने, डॉ.संजय झगडे, शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा. प्रितम ओव्हाळ यांनी अभिनंदन केले.

# स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ मध्ये अमरावती प्रथम

**ज्योतिर्मय साहित्य**

**नवी दिल्ली** – अमरावती शहराने स्वच्छ हवेच्या बाबतीत देशात अव्वल स्थान पटकावले आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने आयोजित स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ मध्ये अमरावतीने ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे. दिल्लीत झालेल्या सोहळ्यात केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्या हस्ते अमरावती महानगरपालिकेला ७५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक आणि ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

अमरावती महानगरपालिकेने स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ मध्ये देशातील ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये प्रथम स्थान पटकावले आहे. राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (एनसीएपी) अंतर्गत घेण्यात आलेल्या या सर्वेक्षणात अमरावतीने २०० पैकी २०० गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि राज्यमंत्री कीर्ति वर्धन सिंह यांच्या हस्ते अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांना दिल्लीत आयोजित एका भव्य सोहळ्यात ७५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत १३० शहरांमध्ये घेण्यात आलेल्या या सर्वेक्षणात हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी अमरावतीने केलेल्या ठोस उपाययोजनांनी सर्वांचे लक्ष वेधले. शहराने रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केली, ज्यामध्ये ३४० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांसह पदपथांची निर्मिती, ५३ उद्यानांचे हरितीकरण आणि १९ एकर ओसाड जमिनीचे घनदाट जंगलात रूपांतर यासारख्या उल्लेखनीय कामगिरीचा समावेश आहे. याशिवाय, धूळ नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, जनजागृती मोहीम आणि हरित आच्छादन वाढवण्याच्या प्रयत्नांमुळे अमरावतीने स्वच्छ हवेच्या बाबतीत देशात आघाडी घेतली.


अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी हा पुरस्कार संपूर्ण अमरावतीकरांचा सामूहिक विजय असल्याचे सांगितले. त्या म्हणाल्या, ''हा सन्मान केवळ महानगरपालिकेचा नाही, तर प्रत्येक नागरिक, स्वच्छता कर्मचारी, अभियंता आणि पर्यावरण तज्ज्ञ यांच्या अथक परिश्रमाचा परिणाम आहे. हा पुरस्कार आम्हाला भविष्यात पर्यावरणस्नेही धोरणे अधिक दृढतेने राबवण्यासाठी आणि अमरावतीला हरित शहर म्हणून नवी ओळख देण्यासाठी प्रेरणा देईल.'' या सोहळ्यात इंदूर, जबलपूर, आग्रा, सूरत, झाशी, मुरादाबाद, अल्वर, देवास, परवानू आणि अंगुल या शहरांचाही त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी सन्मान करण्यात आला. तसेच, इंदूर आणि उदयपूर यांना रामसर करारांतर्गत पाणथळ शहर म्हणून आंतरराष्ट्रीय मान्यता देण्यात आली.










# आठवणींच्या घरात..

**ज्योतिर्मय साहित्य**




किती तरी आता काळ लोटला गेला आहे, अनेक वेगवेगळे प्रवाह ओलांडून झाले आहेत माझे.. आताशा पैलतीरही समोर दिसू लागलेय, अशा वेळी पुढच्या वाटेवरचे पाऊल जपून, सांभाळून टाकायला हवे हे समजतेय पण मन आणि मान मागे वळतीय.. इतके काय आहे हे ओढ लावणारे..?

एका खोलीत झगमगता सुंदर प्रकाश दिसतोय, तर दुसऱ्या खोलीतून विविध सुग्रास पदार्थांचे सुवास प्रेमळ हातासहीत पुढे येत आहेत. स्तोत्रांचा आवाज, आरती आणि देवघरातील स्निग्ध ज्योतीसारखेच हे डोळे कोणाचे दिसताहेत? गाई, वासरांचा हंबर, दारातील रांगोळी, प्राजक्त सडा, फुला फळांनी बहरलेली झाडे काय काय आहे इथे? रुणझुणत्या पैंजणनादासहित खळखळते हसणेही ऐकू येत आहे. उत्फुल्ल, प्रसन्न शुभद तोरणामागे सण समारंभाने भरलेला सोपा दिसतोय. सगळेच सुंदर जणू साद घालतेय मला..

माजघर दिसतेय, काही कडू चवी विसरायला लावून आपल्या अंधार मृदू सावलीत शांतवणार..

इथे एक आडबाजूला जळमटाने भरलेली खोली पण दिसतेय. या खोलीला झरोके नाही आहेत. मोकळ्या आकाशाने जणू पाठ फिरवली आहे इथे.. या खोलीत श्वास गुदमरतोय.. खचाखच नकोशा गोष्टींनी भरलेली, टोकदार शस्त्रांची, भरपूर व्यथित कथांची अशी ही खोली. पण प्रयत्न करूनही हिचे दार बंद का होत नाही आहे..?




काय करू पुढे पाऊल टाकण्यापूर्वी मागे वळतेच एकदा.. गोळा करीन म्हणते भरभरून ओंजळीत तिथली आनंदी आठव फुले, उबदार स्पर्श.. आड बाजूच्या खोलीत गेल्यावर होतीलही जखमा थोड्या.. रक्ताळणारे ओरखडे पण उमटतील मनावर, मान्य आहे मला.. पण पुढचे पाऊल जपून पडेल कदाचित.. आणि उरलेली ही मायेची शिदोरी ऊर्जा देत राहील पुढच्या प्रवासात, ही संपवणार नाहीच आहे मी, सांभाळून ठेवेन हृदयात अत्तरकुपीसारखी. उलट यामध्ये भर घालेन म्हणते अनेकविध दरवळणाऱ्या क्षणांची..

कधी पोहचले इथे, मला समजलेच नाही.. हलकेच शेवटी ओढून कुशीत घेतलेच मला.. या आठवणींच्या घराने...

# रंजनासह संस्कारमुल्ये रूजविणारा ‘‘छान छान गाणी ‘‘

ज्योतिर्मय साहित्य

प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांनी ‘‘बालमित्रांची छान छान गाणी‘‘ हा काव्यसंग्रह स्वतः पोहच केला. कवी शिक्षक म्हणून कार्यरत आहेत म्हणून अध्यापनातून बालकांच्या मनाचा वेध घेणे सहजी जमले आहे, हे सर्वच शिक्षकांना साध्य होत नाही त्यासाठी बालमनाच्या तळाशी जाऊन त्यांचे भावविश्व अलगत उलगडून फ ुलपाखरू होऊन बागडावं लागत ही बालसुलभ किमया कवी प्रदीपगुरुजी यांच्याकडे आहे.

इ ५वी पर्यंतचे बालमन निरागस व कमालीचे चंचल असते.त्यांची निरागसता ही निकोप, निर्मोही असते म्हणूनच ‘‘गॉड इज द इमेज ऑफ इनोसंट चाईल्ड‘‘ असे म्हटले जाते, हि निष्पापता ज्यांच्या ठायी असते तो विधाता म्हणजे बालक. बालमन, बालपण, समृद्ध व संपन्न करण्यास काम बालकाव्य ताकदीने करते, मात्र तेवढी कुवत व प्रगल्भ प्रतिभेचा परमोच्च आविष्कार बिंदू साधण्याचं कसब कवीत असावं लागतं अलीकडे बालसाहित्यावर अनेक साहित्यिक लिहिताहेत तरीही बालकवी ठोंबरे नंतर हे धनुष्य कुणालाही पेलता आलेले नाही हे निर्विवाद सत्य नाकारता येणार नाही.

सदर बालकाव्य संग्रहाचे शीर्षक ‘‘बालमित्रांची छान छान गाणी ‘‘असा आहे.समवयस्क बालगोपालांचा गोतावळा, मैत्री हा बालपणाचा सर्वात मोठा ठेवा असतो. मूलासोबत मूल होण अतिशय अवघड असतं, त्याच्या आकलन पातळीवर जाणं त्याहूनही कठीण.

कवी प्रदीपगुरूजींनी ही बालमित्राची भुमिका समर्थपणे साकारल्याची अनुभूती वाचक वर्गास वाचताना येईलच .बालकांचे मन वेधून घेणाऱ्या, बालमनाला भुरळ घालणाऱ्या ६२ विविध विषयांवरील कवितांचा समावेश संग्रहात आहे.

गाण्यातून मनोरंजन व ज्ञानातून आनंद मिळावा ह्या हेतूने प्रेरीत होउन काव्यसंग्रह प्रकाशित केला असल्याचा निर्वाळा गुरूजींनी मनोगतातून दिलेला आहे.

‘‘पाखरांची शाळा‘‘ ही अशीच एक कविता,

‘‘कबूतराने लिहिले चोचीने धडे
वाद्यांच्या तालावर गात होता
पाढे‘‘

ह्या काव्यपंक्ती कल्पकतेच्या भरारीची साक्ष देतात.बालकाची जिज्ञासू वृत्ती किती प्रबळ असते हे ‘‘खरं खरं सांगशिल कां?‘‘ ह्या कवितेत दिसते

‘‘सांग सांग सुर्योबा, रात्रीला
प्रकाश...
कधी देशील का?‘‘

हा प्रश्न जाणकारांनाही अचंबित करून जातो.


आज ज्ञानप्रपोस्टामुळे लागणाऱ्या अनेक शोधातून माणूस सूखाशीन होत चाललाय.

‘‘रोबोट ‘‘ कवितेतील ओळी हेच अधोरेखित करतात,

‘‘अवकाशात जायला, मंगळावर
फिरायला
ग्रहतारे मोजायला, नवनवीन शोध
लावायला आला नवीन माणूस,
नाव त्यांचे रोबोट‘‘

तंत्रज्ञानाची पूसटशी ओळख करून देणाऱ्या कवीच्या हेतूची प्रशंसा अटळ ठरते.

बालकवितेची भाषाशैली महत्त्वाची असते बालकांचे भावविश्व, बाल मानसशास्त्र लक्षात घेऊन बालकाव्य लिहिले तरच ते पचनी पडते.ओढून ताणून रचलेली यमकरचना फसते. प्रदीपगुरूजींची भाषा शब्दजंजाळात न अडकणारी




आहे .

भारत सातपुते यांनी सहज सोप्या व दैनदिन व्यवहारातील शब्द सामर्थ्याचे उचित महत्व

प्रस्तावनेत सांगितले आहे, ‘‘आईच्या कुशीत बाळ खेळावे तसे हे शब्द आहेत‘‘.

पहिल्या काव्यसंग्रहाच्या मर्यादा नजरे आड करता येणार नाहीत. आकलनशक्तीच्या व आवाक्या बाहेरच्या दीर्घ गद्यकाव्य सदृश रचना टाळता आल्या असत्या.

बडबड गीताचा गेयता हा मूलाधार असतो . अशा गीतांतील गेयता असणारी गाणी संग्रहाची शोभा वाढवतात.‘‘नियम‘‘ हे गाणं आनंद देऊन संस्कार रूजविते,

‘‘वागणूक नम्र ठेऊ या
घराची स्वच्छता राखू या
मोठ्यांचा आदर सन्मान करू या
नियम माझे पाळू या‘‘

‘‘पाणी‘‘ हे पाण्याचे महत्त्व विशद करणारे मनवेधी चाल असलेले बडबड गीतं,

‘‘ थेंब थेंब पाणी
गोल गाऊ गाणी!
वाहत जात पाणी
अडवू त्याला राणी!‘‘

मोबाईलचा अतिरेकी वापर बालकांच्या दिनचर्येचा अविभाज्य भाग बनला आहे, इडियट बॉक्सची स्क्रीन समोर असल्याशिवाय ९०% मूलं जेवत नाहीत.बालकांचा मोबाईल हटविणे ही पालकांची मोठी डोकेदुखी ठरली आहे. याविषयीचे वास्तव चित्रण ‘‘मोबाईल‘‘मध्ये ठाशीवपणे आले आहे,

‘‘असा आमुचा नवा पाहुणा
त्याच्याशिवाय करमत नाही
तो संगतीला असल्याबिगर
घरात कुणी जेवत नाही‘‘

बालकांना मोबाईल पासून दूर ठेवण्यासाठी मैदानी खेळासाठी प्रवृत्त करणे हा एक प्रभावी उपाय आहे . खेळात रूची निर्माण होईल अशा कवितांना जाणीव पूर्वक संग्रहात समाविष्ट केले आहे .

फुलपाखरू,मी गेम खेळतो, चॅम्पियन ट्रॉफी, फू बाई, ह्या काही लक्षवेधी कवितांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते

‘‘फू बाई फू झिम्मा
फू
खेळतेस कां ग
बॅटमिंटन तू....
बाई बॅटमिंटन तू..‘‘

अशा रंजक कविता बालमनाशी जोडल्या जातात.अलीकडचा टक्केवारीधिष्टीत बोजड बालमन कुंठित करणारा अभ्यासक्रम बालकांना पुस्तकांपासून दूर नेत आहे.याचाही विचार प्रदीपगुरूजींच्या काव्य निर्मितीत दिसून येतो.

खारुताई व बागेतील मजा ह्या कविता बालकांचे भावविश्व समृद्ध करणार्या आहेत

मैत्री बालमनाचा स्थायी भाव असतो सवंगडी, सांघिक खेळ, सणांच्या निमित्ताने एकत्र येणे हे दूरापास्त झाले आहे पर्याप्त एकटेपणामुळे मूलं आत्मकेंद्री बनली आहेत.

खारुताई कवितेतील ही खंत मन विषण्ण करणारी आहे,‘‘ ‘‘खारुताई
खारुताई
ये ना खाली
माझ्याशी खेळायला कुणी नाही
वाली!‘‘

मनोरंजनाबरोबरच संस्कार मूल्ये रूजविणारा हा काव्यसंग्रह नक्कीच बालसाहित्य विश्वात आगळीवेगळी मोहोर उमटवणारा आहे

.,‘‘बाळा जरा जपून‘‘ ही संस्कार शिदोरी असणारी कसदार कविता याची पुष्टी देणारी आहे

‘‘शाळेतून आल्यावर हातपाय धुवून सांजवात लावून अभ्यास करीत जा.‘‘

देशभक्ती, समानता, भूतदया, स्नेहभाव, बंधुता, मैत्री, श्रमप्रतिष्ठा ही जीवनमूल्ये सर्व कवितांमधून जाणवतात.


प्रदीपगुरूजींनी मानवता बूक फाऊंडेशन च्या वतीने जि. प. शाळेला विनामूल्य पुस्तक भेट देण्याचा स्तुत्य उपक्रम राबवून आदर्श शिक्षकांचे कर्तव्य चोख बजावले आहे , त्यामुळे ते जीवन गौरवास पात्र ठरले आहेत .त्यांचे हार्दिक अभिनंदन!!!

यापुढील गुरुजींची बालकेंद्री लेखणी बालसाहित्यात दखलपात्र ठरेल याची खात्री बाळगतो.

चिन्मय ग्राफिक्स व कव्हर डिझाईन ने बोलके व मनोहर मुखपृष्ठ साकारले आहे.हृद्य प्रकाशनाने अतिशय सुंदर, सुबक व देखणा संग्राह्य काव्यसंग्रह प्रकाशित केला असून बालसुलभ बोल्ड टाईप छपाई,कवितानुकूल लक्षवेधी आशयवृद्धि करणारी चित्रांची सुसंगत मांडणी हे काव्यसंग्रहाचे आकर्षण व गुणवैशिष्ट्ये म्हणणे संयुक्तिक होईल.

कवी प्रदीपगुरूजी पिंपळनेरकर यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी आभाळभर शुभेच्छा व पुरजोर पाठराखण !

काव्यसंग्रह: बालमित्रांची छान छान गाणी
कवी: प्रदीप पिंपळनेर कर
प्रकाशन: हृदय प्रकाशन, कोल्हापूर
किंमत:१६०



समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरे
शब्द संवाद:९४०४०४८६०१

# सह्याद्रीच्या हृदयातील अभेद्य गड : प्रतापगड

ज्योतिर्मय साहित्य

सह्याद्रीच्या उंचसखल डोंगररांगांमध्ये, दाट जंगलांच्या कुशीत आणि नागमोडी घाटांच्या वळणावर अभिमानाने उभा असलेला प्रतापगड हा मराठा इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या गडाचे सामरिक महत्त्व केवळ त्याच्या उंचसखल भौगोलिक रचनेत नाही, तर आजूबाजूच्या दऱ्या, खोऱ्या आणि घाटांवर ठेवलेल्या नियंत्रणातही दडलेले आहे. महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध डोंगरी किल्ला म्हणून या किल्ल्याची ओळख आहे. सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यात महाबळेश्वरच्या नैर्ऋत्येस १३ कि.मी. वर हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची १,०९२ मी. आहे. पूर्वेकडील बाजूस ३४० मी. आणि पश्चिमेकडे ८७० मी. खोल दरी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी जावळी खोरे जिंकल्यानंतर मोरो त्रिंबक पिंगळे यांना १६५६ मध्ये हा किल्ला बांधून घेण्याची आज्ञा दिली.

प्रतापगड हा बालेकिल्ला आणि त्याच्या सभोवतालचा खालचा भाग, अशा दोन प्रमुख भागात विभागलेला आहे. डोंगराच्या शिखरावर असलेल्या बालेकिल्ल्यात राजवाडा, सदर, केदारेश्वर मंदिरे, पाण्याच्या टाक्या आणि धान्य-रसद साठवणीसाठीच्या कोठाऱ्या यांसारखी महत्त्वाची बांधकामे होती. तर दक्षिण व पूर्व उतारावर बांधलेल्या खालच्या भागात पहिली तटबंदी आणि प्रचंड बुरुज शत्रूला दरीतच अडकवून ठेवण्यासाठी होती.

मुख्य किल्ला, माची आणि बालेकिल्ला असे या किल्ल्याचे तीन भाग होतात. मुख्य किल्ला व बालेकिल्ला भागांत तलाव असून संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्याच्या चोहोबाजूंस भक्कम तटबंदी व बुरूज आहेत. बालेकिल्ल्याचे क्षेत्रफळ ३,६६० चौ. मी., तर मुख्य किल्ल्याचे ३,८८५ चौ. मी असून दक्षिणेकडील बुरूज १० ते



१५ मी. उंचीचे आहेत. त्यांपैकी रेडका, राजपहारा, केदार इ. बुरुजांचे अवशेष टिकून आहेत. बुरूज वैशिष्ट्यपूर्ण असून निमुळत्या डोंगर धारेच्या शेवटी आहे. या भागाला माची म्हणतात. कारण अशाच स्वरूपाचे बांधकाम राजगड (सुवेळा व संजीवनी), तोरणा ( झुंजार) या किल्ल्यांवरील माच्यांना आहे. किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी तब्बल ४० फूट उंच असून तिच्या भक्कम रचनेमुळे प्रतापगड अभेद्य बनला होता. संपूर्ण बांधकाम काळ्या पाषाणात केले गेले आहे. गडाच्या उंच बुरुजांवरून जावळीच्या खोऱ्यातील डोंगर-दऱ्यांवर सतत नजर ठेवता येत असे, त्यामुळे शत्रूच्या हालचाली वेळेत ओळखणे सोपे होत असे.

मुख्य किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे पार करून जावे लागते. दोन्ही दरवाजांवर शरभाच्या प्रतिमा दिसतात. दोन दरवाजे पार केल्यावर तुळजा भवानीचे मंदिर आहे. या देवालयासमोर दोन उंच दीपमाळा आहेत. त्या जवळच नगारखान्याची इमारत आहे. भवानी देवीचे मूळ मंदिर दगडी गाभाऱ्याचे होते. १८२० मध्ये साताऱ्याच्या प्रतापसिंह महाराजांनी तेथे लाकडी मंडप बांधला.

अरुंद, नागमोडी चढणाऱ्या वाटा आणि दारांच्या पुढे लपवलेले मजबूत अडथळे यामुळे कुणालाही सरळपणे गडावर प्रवेश करणे शक्य नव्हते. महादरवाजा तर संरक्षणकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. गोमुखी शैलीत बांधलेला हा दरवाजा रचनेत इतका कुशल होता की, अरुंद मार्गाने आत येणाऱ्या शत्रूंना दोन्ही बाजूंच्या बुरुजांतून सहज हल्ल्याच्या टप्प्यात आणले जाई.

प्रतापगडाचे एक अनोखे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सुसंरचित जलव्यवस्था. किल्ल्यावर चार प्रमुख पाण्याच्या टाक्या आहेत. यापैकी दोन बालेकिल्ल्यात तर दोन खालच्या भागात आहेत. पावसाचे पाणी साठवण्यासाठी नैसर्गिक उतारांचा कुशलतेने वापर करण्यात आला होता. त्यामुळे गडावरील लोकसंख्येला वर्षभर पुरेल इतका पाणीपुरवठा व्हायचा. ही योजना मराठ्यांच्या अभियांत्रिकी व व्यूहनीती कौशल्याचा अद्वितीय नमुना ठरते.

प्रतापगडचे ऐतिहासिक महत्त्व अफझलखान छत्रपती शिवाजी महाराज भेट व त्याप्रसंगी झालेला अफझलखानाचा वध या घटनेमुळे वाढले (१६५९). छत्रपती राजाराम महाराज सुद्धा जिंजीस जात असताना प्रथम प्रतापगडास आले. स्वातंत्र्योत्तर काळात या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला. त्याचे अनावरण १९५७ च्या नोव्हेंबर महिन्यात तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी केले.

आजही हजारो लोक केवळ त्या क्षणाशी नाते जोडण्यासाठी प्रतापगडावर भेट देतात. गडावर दरवर्षी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. अफझलखान भेटीचे नाट्यरूप सादरीकरण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी निगडित उपक्रम यामुळे प्रतापगड महाराष्ट्राच्या अस्मिता आणि सांस्कृतिक एकतेचे केंद्र ठरतो.

प्रतापगड मराठ्यांच्या धैर्य, रणनीती आणि स्वराज्याच्या स्वप्नाचा जिवंत साक्षीदार आहे. सह्याद्रीच्या कुशीत उभा असलेला हा गड आजही भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा एक अढळ दुवा आहे.

युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा मानांकन दिले असून त्यात प्रतापगडाला विशेष स्थान मिळाले आहे. त्यामुळे प्रतापगड आज केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता जगाच्या सांस्कृतिक वारशाचा एक अनमोल ठेवा म्हणून गौरवला जातो.

संजय डी.ओरके
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई.

# छत्रपती संभाजी महाराज मराठी साहित्य संमेलन पुण्यात

## ५ ऑक्टोबर २०२५ रोजी महात्मा फुले सांस्कृतिक भवनात होणार आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे–** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने १७ वे छत्रपती संभाजी महाराज मराठी साहित्य संमेलन रविवार दिनांक ५ ऑक्टोबर २०२५ रोजी महात्मा फुले सांस्कृतिक भवन वानवडी पुणे येथे होणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी दिली आहे. यावेळी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे प. म. कार्याध्यक्ष विक्रम शिंदे उपस्थित होते.

ग्रंथपूजनाने या संमेलनाची सुरुवात होणार असून त्यानंतर उद्घाटन समारंभ, पुरस्कार वितरण, परिसंवाद, कविसंमेलन असे संमेलनाचे स्वरूप असणार आहे. १६ भाषांमध्ये पारंगत असलेले बुधभूषण, नायिकाभेद, सातशतक, नखशिख, ग्रंथाचे लेखन करून मानवी मूल्यांपासून राजनीती, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, नैतिकशास्त्र, धर्मशास्त्र, विधीशास्त्र, न्यायशास्त्र, वनस्पतीशास्त्र, यासह अनेक विषयांत निष्णात असलेले जागतिक कीर्तीचे विचारवंत छत्रपती संभाजी महाराज यांच्या साहित्यिक पैलूंचा व त्यांच्या इतिहासाचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून या साहित्य संमेलनाचे आयोजन दरवर्षी राज्यभरात विविध ठिकाणी केले जाते. आतापर्यंत राज्यात छ. संभाजी महाराज यांच्या नावाने १६ साहित्य संमेलने यशस्वीपणे पार पडली आहेत. पुण्यात होणाऱ्या या साहित्य संमेलनात रसिक साहित्यिकांनी सहभागी व्हावे यासाठीही आवाहन यावेळी करण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ, क्रांतिसिंह नाना पाटील मंडळाचा उपक्रम



ज्योतिर्मय साहित्य

**पाटोदा–** क्रांतीनगर येथील क्रांतीसिंह नाना पाटील गणेश मंडळाने विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, अभिनय, वक्तृत्व, चित्रकला अशा विविध कलागुणांचे सादरीकरण केले. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विजेत्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

मंडळाचा हा उपक्रम पाटोदा शहरात कौतुकास्पद ठरला आहे. दरवर्षी मंडळाकडून सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उपक्रम राबवले जातात. यंदा गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी हा विशेष कार्यक्रम घेण्यात आला.

या उपक्रमासाठी मंडळाचे अध्यक्ष विजय शिंदे, उपाध्यक्ष सुमित कुटे, रोहन वीर, सचिव निखिल सरगर, सदस्य सतीश घोलप, तोशिप खान, दिपक वीर, योगेश इंगोले, अक्षय वीर, जयसिंग सोंडगे, शिवम चौरे, ऋषिकेश वीर, अभी जाधव, यश जावळे, अनिकेत जावळे, अमन शेख, अजित बेद्रे, मुकेश ननवरे, विशाल महामुनी, आप्पा राऊत, रोहित वैद्य, रोहन केकान, अजय वाल्हेकर यांनी परिश्रम घेतली.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559